
Adelaide Marathi Mandal
Incorporation No. A40023

## ॲडलेड मराठी मंडळ

# मृद्गंध



## गुढीपाडवा २०२१

श्री शालिवाहन शके १९४३
प्रारंभ

# अनुक्रमणिका

अनुक्रमणिका ........ 1
संपादकीय ........ 2
परमेश्वर स्वरूप ........ 3
सृष्टीचा पहिला महिना ........ 5
नवी स्वप्नं ........ 8
कथा एका नव्या दिशेची ........ 10
गप्पा ........ 18
झोप ........ 21
हॉटेल आरोग्य ........ 23
मी दिलेली लाच ........ 25
बालविभाग ........ 31
ॲडलेड मराठी विद्‍यालय ........ 34

# संपादकीय

नमस्कार,

मृद्गंधचा हा गुढीपाडवा २०२१ चा अंक प्रकाशित करताना मला अतिशय आनंद होत आहे. हा अंक छोटेखानी असला तरीही वैविध्यपूर्ण आहे. ह्या अंकासाठी नवीन वर्ष नवीन सुरुवात ही संकल्पना घेतली होती. त्या संकल्पनेला अनुसरून लेख आहेत, भारतीय संस्कृतीतील परमेश्वर ह्या विषयावरचे लेख अतिशय वाचनीय आहे. सोबत काही खुसखुशित छोटेखानी लेख, एका लाचखोराला घडवलेल्या अद्दलीची रोमांचक कथा आणि मराठी शाळेतील बाल-लेखक कलाकारांनी दिलेलं साहित्य अशा वॅविध्याने नटलेला अंक तुम्हाला आवडेल अशी आशा आहे.

नेहेमीप्रमाणे ह्या ही अंकाची सजावट श्री. पराग विश्वासराव ह्यांनी सुंदर प्रकारे केली आहे त्याबद्दल त्यांचे आभार.

कळावे आपला नम्र

अभिजित मोहोळकर

(संपाद्क)

# परमेश्वर स्वरूप

अनेकांना प्रश्न पडतो कि परमेश्वराचे खरे रूप काय आहे ? कारण आपण त्याची निरनिराळी प्रतीके पाहतो. उदा. गणपती,विष्णू,वगैरे. गणपतीच्या भक्तांना जर परमेश्वराचे दर्शन झाले तर ते आपल्याला परिचित स्वरूपात होते. तसेच इतर देवांचे.अर्थात परमेश्वर एकच आहे पण आपल्या धर्माने आपल्याला हे स्वातंत्र्य दिले आहे व देवाला कोणत्याही स्वरूपात भजण्याची आपल्याला मुभा आहे,.लोकमान्य टिळकांनी हिंदू धर्माची व्याख्या करताना 'उपास्याणाम अनियम ' म्हणजे कोणते दैवत असावे यावर बंधन नाही असे म्हंटले आहे . त्या त्या देवतेचे भक्त त्यांचेच दैवत श्रेष्ठ आहे असे मानतात .यालाच हेनोथेईसम असे म्हणतात. विचारांती परमेश्वर एकच आहे व त्याला निरनिराळे लोक निराळ्या स्वरूपात पहातात (एकं सत विप्रा बहुधा वदन्ति). शिवाय परमेश्वराचे एकच विशिष्ट रूप आहे असे मानल्यास त्यावर बंधन घातल्या सारखे होते म्हणून तर देवाला एका म्हणण्याच्या ऐवजी अद्वितीय म्हणतात यास्तव ऋषीमुनींनी परमेश्वर निर्गुण ,निराकार आहे असे ठरविले .

शंकराचार्यांचे परब्रह्म निर्गुण व निराकार आहे व केवळ ज्ञानानेच त्याची अनुभूती येते जीव व ब्रह्म यांचे ऐक्य (जीवो ब्रहमैव नापर )हे तत्वज्ञान खूपच गाढ आहे. सगुण परमेश्वर नाकारल्याने भक्तीस वाव नाही आचार्यांनी जरी सामान्य जनतेसाठी वैयक्तिक देवास स्थान दिले तरी त्यांचा भर निर्गुण ब्रह्मावरच होता. याची प्रतिक्रिया म्हणून विशिष्ट अद्वैत , द्वैत वगैरे मतांची स्थापना झाली. या दोन्ही तत्वज्ञानात वैयक्तिक देवतेची आराधना करता येते व यातूनच शैव ,शाक्त ,वैष्णव वगैरे पंथ निर्माण झाले.

निर्गुण निराकार ब्रह्मास सत चित आनंद म्हंटले आहे. सत म्हणजे अस्तित्व . परमेश्वर आहे याचा पुरावा म्हणून कॅंटरबारी च्या बिशप ने ऑन्टॉलॉजिकल प्रूफ हा विचार मांडला. थोडक्यात म्हणजे परमेश्वर अशी एकाच वस्तू (!) आहे जी परिपूर्ण आहे व अस्तित्व हा गुणधर्म अशा वस्तूस असलाच पाहिजे म्हणून परमेश्वर आहे असे सिद्ध होते असे त्यांचे म्हणणे . इतर तत्वेत्यांनी यावर आक्षेप घेतला आहे. असो .

चित म्हणजे जाणीव ,चेतना . यालाच 'प्रज्ञानं ब्रह्म' असे ऐतरेय उपनिषदात म्हंटले आहे. विद्यारण्य स्वामींनी प्रज्ञानं या शब्दाची व्याख्या " येण ईक्षते शृणोतीइदं जागृती व्याकरोति च/स्वादु आस्वादू विजानाति तत् प्रज्ञानं उदीरतं" म्हणजे ज्यामुळे आपल्याला ज्ञानेंद्रियापासून दृष्टी आवाज वास वगैरे कळतात ते प्रज्ञान . प्रज्ञानं ब्रह्म हे पहिले महावाक्य ऐतरेय उपनिषदात आहे.

आनंद -- आपल्या पंच कोशमय देहातील सर्वात आतला कोष ज्याला आनंदमय कोश म्हणतात . हे आत्म्याचे वसतिस्थान आहे . आत्मा /परमेश्वर  आनंदस्वरूप आहे. आनंद हा त्याचा स्थायी भाव आहे.

असा हा सच्चीदानंद परमेश्वर सगळीकडे आहे . ईशावास्य उपनिषद पहिल्याच श्लोकात म्हणते " ईशावास्यमिदं सर्वम"

तैत्तिरीय उपनिषदात परमेश्वराने सृष्टी निर्माण केली व तो त्यात शिरला व एकरूप झाला असे म्हंटले आहे . यास्तव परमेश्वरास शोधण्यास कोठे जाण्याची आवश्यकता नाही .

अवधूत गीतेत " त्वद यात्रया व्यापकता हता ते स्तुत्या मया वाक्परता हता ते ध्यानेंना चेत परत हता ते-- म्हणजे  मी यात्रेला जाऊन तुझी व्यापकता नाकारली ,तुझी स्तुती करून तू स्तुती पलीकडे आहेस हे नाकारले व ध्यान करून तू त्याच्याही पलीकडे आहेस हे पार नाकारले व या तीन अपराधांची मला क्षमा कर असे म्हंटले आहे.

अशा परमेश्वराची भीती बाळगण्याचे कारण नाही, तो आनंदमय आहे. त्यामध्ये द्वेष सुडाची भावना वगैरे नाही. सगळीकडे असल्याने परमेश्वर सर्वांना उपलब्ध आहे. त्या साठी षोडशोपचार पूजेची गरज नाही.

भागवतामध्ये प्रल्हाद त्याच्या सवंगड्यास म्हणतो " सर्व प्राणीमात्रात हरी आहे असे मानून त्यांची इच्छा पुरविणे व त्यांचा सांभाळ करणे हि खरी ईश्वर भजनाची रीत आहे व मूर्तिपूजा हा गौण भाग आहे. जो माणूस हे अस्तित्व विसरून नुसती पूजा करतो तो जणू विझलेल्या अग्नीत आहुती टाकतो व पूजेचे विडंबन करतो "

परमेश्वर हि एक शक्ती आहे व भक्तीने त्याच्याशी जवळीक साधता येते .

सदानंद लिमये

# सृष्टीचा पहिला महिना

गुढीपाडव्याचा सन आतां उभारा रे गुढी
नव्या वरसाचं देनं सोडा मनांतली आढी
गेलसालीं गेली आढी आतां पाडवा पाडवा
तुम्ही येरांयेरांवरी लोभ वाढवा वाढवा....

गुढी पाडव्याच्या, नववर्षाच्या स्वागतार्ह आपल्या सर्वांच्या आवडत्या बहिणाबाई चौधरी यांनी अहिराणी भाषेत व्यक्त केलेल्या ह्या त्यांच्या सहज सुलभ भावना!


चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजेच चैत्र पाडवा, भारतीय नववर्षाची सुरुवात. खगोलशास्त्रिय स्थिती  वसंत संपात - वसंत ऋतुची सुरुवात. सृष्टीच्या निर्मितीचा पहिला महिना, पहिला दिवस, पहिला सण - गुढी पाडवा.  साडेतीन मुहूर्तांपैकी एक. ह्या शुभदिनाचे स्वागत करूया, शुभसंकल्पांची गुढी (ब्रह्मध्वज) उभारून आणि रांगोळी घालून. दररोज नव्या दिवसाच्या स्वागतार्ह वा सणावारी उंबरठ्या पुढे काहीजणी नेमाने रांगोळी घालतात. तर दिवाळीत रांगोळी सजवणे, तुळशीवृंदावना समोर रांगोळी घालणे किंवा ओवाळण्यासाठी आसना भोवताली रांगोळी घालणे, पूजेच्या चौरंगा भोवताली रांगोळी घालणे आणि खास समारंभाला, वाढदिवसाला ताटा भोवती रांगोळी काढणे हे बहुतेकांचे लहानपणापासूनचे संस्कार. परंतु चैत्रातील शुभ चिन्हांचे वैशिष्ट्यपूर्ण चैत्रांगण ही खचितच एक खास रांगोळी. तसेच गुढीचे. मग ती खिडकीत उभारलेली गुढी असो, गॅलरीत उभारलेली गुढी असो नाहीतर पाटावर उभारलेली गुढी असो. प्रत्येक गुढीचे जरतारी वस्त्र निराळे, पुष्पहार वेगळे आणि कलशही खासे. पण ह्या शुभदिनी गोडाधोडाच्या जेवणा आधी कडुलिंबाचे चाटण मात्र कोणाला चुकत नाही.



प्रथमतः ठेवू पाट स्थैर्याचा,
त्यावर श्रीफळ सिद्धी प्राप्तीचा

वेळू काठी दर्शवे सामर्थ्य,
कलश स्वस्तिक यशश्री सार्थ

जरीवस्त्रांचे वैभव लेऊन,
मांगल्य दरवळे पुष्पहारातून




लिंबफाटा असे आरोग्यासाठी,
सोबत बत्तासा माधुर्यासाठी

पानसुपारी, हळद-कुंकु वाहून,
सजवू चैत्रांगण रांगोळी घालून

[ **चैत्रांगण फोटो: google image]**

अश्या ह्या चैत्राचे खास नाते ऋतुंचा राजा, ऋतुपतीचे द्वार, ऋतुश्रेष्ठ वसंत ऋतुशी. रंग, रूप, रस, गंध, स्वर, स्पर्शासहित वसुंधरेच्या लावण्याला नटवणारा, हसवणारा, वृक्षलता बहरवणारा आणि फुलाफळांत अमृत भरणारा वसंतस्या: गमे चैत्रे! दुर्गाबाई भागवत यांनी त्यांच्या ऋतुचक्रात संबोधलेला वसंत हृदय चैत्र! महाकवी कालिदास यांच्या 'ऋतुसंहार', वसन्तवर्णनामध्ये प्रतित होणारा, मदनाची सर्व आयुधे घेऊन आलेला वसन्तयोद्धा! ज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या अध्यायात माउली ज्यास ऋतुपतीचे द्वार म्हणतात तो ही हाच चैत्र सखा वसंत ऋतु!

"जैसे ऋतुपतीचे द्वार। वनश्री निरंतर। वोळगे फळाभार। लावण्येसी।"(३:१००)

सार्थ ज्ञानेश्वरी सांगते: ज्याप्रमाणे ऋतुश्रेष्ठ वसंताच्या द्वारी वनशोभा नेहमीच फळभाराचे सौंदर्य धारण करून सिद्ध असते, तसे दैव सर्व सुखसमृद्धी बरोबर घेऊन तुम्हाला शोधत येईल, जर तुम्ही स्वधर्माचे ठायी निष्ठा ठेवून वागाल, आणि भगवदगीतेच्या विभूतियोगातही श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितले, पृथ्वीवरचा कुसुमाकर, म्हणजे वसंत ऋतु, तोही मीच! (१०:३५)

अश्या ह्या नवं चैतन्याने बहरलेल्या वसंत ऋतुतील आनंददायी, गंधित, लोभस वातावरणाने, कोकीळ स्वरांनी आणि भ्रमर गीतांनी मोहित होउन, महाकवी कालिदासांच्या ‘रघुवंश’ बरोबरच इतर अनेकविध कविकल्पनांचा आविष्कार न दिसता तर नवलच. जसे:
कोयलिया बोले अंबुवा डार पर,  ऋतु बसंत कि देत संदेसवा, कुहू कुहू बोले कोयलिया, कुंज कुंज में भंवरा डोलें, गुन गुन बोलें, सज सिंगार ऋतु आयी बसंती...., ऋतुराज आज वनीआला.... या सारख्या अनेक सुपरिचित गाण्यांनी.

आपल्या दक्षिण गोलार्धात मात्र, ऋतुचक्रानुरूप हा काल म्हणजे - शरद संपात, पानगळीच्या मोसमाची सुरुवात. तरीही ह्यावर्षी खऱ्या अर्थाने पल्लवित होतील त्या आशा.... COVID-19 vaccine मुळे.  त्यामुळे यंदाच्या गुढीपाडव्याच्या सुमुहूर्तावर वर्षभराच्या COVID-19 शी निगडित संहारक आठवणींना मागे सारून, माधुर्याच्या, सामर्थ्याच्या आणि समृद्धीच्या नवपल्लवीत आशांनी, नववर्षाचे स्वागत करूया.

त्याच अनुषंगाने असं म्हणावसं वाटतं:

सौहार्दाने करू साजरा सण पहिला वर्षाचा
गुढी उभारून एकमुखाने करू प्रार्थना
आरोग्यम धनसंपदा

सर्वांगी बाणवू सृष्टिमाते प्रति आदर
स्वधर्म पालन हाच असावा भाव निरंतर
उघडेल सौख्याचे द्वार

**डॉ. मंगला नाडकर्णी**
**सिडनी**

# नवी स्वप्नं

प्रत्येक नवे वर्ष नवी स्वप्नं घेऊन येतात
काही फुलतात, काही अलगद मिटून जातात...

युरोपची सफर , हिमालयाचं शिखर
आफ्रिकेचं जंगल, अंटार्क्टिकाचे पेंग्विन
सारे सारेच खुणावतात...
प्रत्येक नवे वर्ष नवी स्वप्नं घेऊन येतात
काही फुलतात, काही अलगद मिटून जातात... ॥ १ ॥

गच्च भरलेले पुस्तकाचे कपाट, दूर जाणारी पायवाट
माहिफिलीचे सूर, नि चित्रकलेचे रंग
आसुसले होऊन वाट पाहतात...
प्रत्येक नवे वर्ष नवी स्वप्नं घेऊन येतात
काही फुलतात, काही अलगद मिटून जातात... ॥ २ ॥

आईची माया, बायकोची छाया
मुलीचे बंध, सुनेचे नाते
हरघडी नव्याने जन्मतात...
प्रत्येक नवे वर्ष नवी स्वप्नं घेऊन येतात
काही फुलतात, काही अलगद मिटून जातात... ॥ ३ ॥

कवितेचे शब्द, आरशात डोकावणारे आपलेच प्रतिबिंब
क्षितिजावरची सोनेरी छटा, मातीचा गंध
सारे नवनवीन अनुभूती देतात...
प्रत्येक नवे वर्ष नवी स्वप्नं घेऊन येतात
काही फुलतात, काही अलगद मिटून जातात... ॥ ४ ॥

देशाटनाची ओढ, रंगीबेरंगी छंदांची दुनिया
मायेची नाती, नि शब्दांच्या अनोख्या गाठीच
अखेर काळजात घर करून राहातात...
प्रत्येक नवे वर्ष नवी स्वप्नं घेऊन येतात
काही फुलतात, काही अलगद मिटून जातात... ॥ ५ ॥

पल्लवी कुलकर्णी-अत्रे (मेलबर्न)

# कथा एका नव्या दिशेची

“आपण ऑस्ट्रेलियात येऊन चूक केली का रे?” वीणा हताश होऊन श्री ला म्हणाली.

डायनिंग टेबलवर पसरलेली बिलांची चळत तिच्याकडे आ वासून पाहत होती. रात्रीचं जेवण संपल्यावर श्री नेहमीप्रमाणे फेसाळलेल्या कॉफीचे दोन कप घेऊन तिच्या बाजूला येऊन बसला होता. कपवरची नजर वर न करता त्याने उत्तरादाखल ह्या कानापासून त्या कानापर्यंत डोकं हलवलं आणि सुस्कारा टाकला. त्याला पुण्यातली, दोघांच्याही व्यावसायिक जीवनाची, उमेदीची पण यशस्वी वर्षं आठवली. इंडस्ट्रियल डिझायनर श्री आणि कमर्शिअल आर्टिस्ट वीणाला, आपापल्या व्यस्त दिवसानंतर एकत्र बोलायला हाच तर वेळ मिळायचा. कॉफी, हे श्रीचं किचन मधलं एकमेव कौशल्य. पेल्यात साखर, इन्स्टंट कॉफीची पूड आणि थोडं दूध घालून त्यात चमचा खडखडवायला त्याला पूर्वी खूप आवडायचं. त्यात उकळलेलं, अर्ध दूध आणि अर्ध पाण्याचं मिश्रण घातलं, कि फेस उफाळून वर यायचा. ते वाफाळलेले क्षण, वीणा आणि त्याच्या दिवसाखेरीचा विरंगुळा असायचे.

हल्ली मात्र दिवसभर ‘Woolies’ मध्ये शेल्व्हज स्टॅक करायचं, अंगमोडीचं काम करून थकल्यावर, त्याला कधी एकदा बिछान्याला पाठ टेकवतो असं व्हायचं. ऑस्ट्रेलियातल्या गेल्या दोन वर्षांनी त्यांच्या आयुष्याची उलथापालथ करून टाकली होती. रात्रीची कॉफी आता एक सवय बनून राहिली होती. बदललेल्या आयुष्यात पुर्वीपासूनचं राहिलेलं एकच सातत्य. श्रीच्या जड झालेल्या पापण्यांपुढे ऑस्ट्रेलियातले सुरवातीचे दिवस सर्र्कन फिरले. पहिले काही महिने, प्रगत देशाचे नागरिक बनण्याच्या संधीचा उत्साह त्या दोघांच्याही चेहऱ्यावरून ओसंडून वाहिला होता. नवीन गोष्टी शिकण्याचं नावीन्यही होतं. नवीन देश, नवीन संस्कृती, त्याच इंग्रजीचे वेगळे उच्चार, हे सर्व आत्मसात करताना थोडं अवघड झालं होतं, पण ध्येय साध्य करण्याची एक जिद्द होती. धडपडीतही एकमेकाना नजरेने धीर देण्यात समाधान होतं. सध्या रेन्टल युनिट असलं, तरी अडचणींच्या मार्गावर कष्टाचे बूट झिझवल्यावर, एक दिवस भरभराटीचा महाल दिसणार याची प्रचंड उमेद होती.

दहा वर्षाच्या दिशाला मात्र सुरवातीला शाळेत जमवून घेणं खूपच कठीण पडलं होतं. पहिल्याच दिवशी टीचर ने स्वागतार्थ 'हॅलो' म्हटलं तेंव्हा दिशाने हात जोडून नमस्कार केला आणि टीचरचं मन जिंकून घेतलं, पण इतर मुलांचं बोलणं नीट न समजल्याने मित्र मैत्रिणी जमवायला थोडा वेळ लागला. शाळेचं नाव काढलं कि पोटं दुखायला सुरुवात होणाऱ्या दिशाला मग आई आणि बाबा दोघेही शाळेत सोडायला जायला लागले.

या खेपांमधूनच इतर मराठी पालकांच्या ओळखी झाल्या आणि एकाच नावेतले सहप्रवासी असल्याने वाढल्या. पुढे भेटीगाठीतुन, माहितीच्या देवाणघेवाणिपासून - सुखदुःख्खाच्या देवाणघेवाणिपर्यंत मैत्री वाढली. नोकरीच्या आघाडीवर मात्र बहुतेकांनाच अवघड गेलं होतं. ‘Local Experience’ चा बागुलबुवा दंड ठोकून पुढ्यात उभा ठाकायचा. एकमेकांची विचारपूस करत मित्र, एम्प्लॉयर्स च्या अतिचोखंदळ माईंडसेट ची थट्टा करत, एका अर्जाच्या नकाराच्या नाराजीतून दुसऱ्या अर्जाकडे वळू लागले.

बऱ्याच जणांच्या सुदैवाने ऑस्ट्रेलियन माईंडसेट मधे “An Indian in the City was by default in IT”.  अर्धे मित्र आधीच ‘IT’ मध्ये होते आणि बाकीच्या इंजिनिअर मित्रांनी Indian = IT, या 'ब्रँड' च्या घोड्यावर स्वार होऊन ‘IT’ चा मार्ग निवडला. हळूहळू मित्रमंडळीतल्या एकेकाला नोकऱ्या मिळू लागल्या आणि खऱ्या अर्थाने इथल्या मातीत रुजणं सुरु झालं – त्यांचं.

श्री आणि वीणाचाही ‘Coding’ अवगत करण्याचा प्रयत्न करून झाला. परंतु त्यांचा Artistic Brain शेकडो ओळींच्या ‘Programming’ मधे वाट हरवून बसला. इंडस्ट्रियल डिझाइन आणि कमर्शिअल आर्ट च्या किल्ल्यांवर अथक धडका मारूनही दरवाजे उघडत नव्हते आणि नोकरीच्या बुरुजावर निशाण लागण्याची आशा हळूहळू खचून चालली होती.

ती अजूनपर्यंत!

कॉफीचा घोट गिळून श्रीने आकड्यांची बेरीज करणाऱ्या वीणा कडे पाहिलं. सततची निराशा त्याच्या डोक्यात पांढऱ्या केसांच्या रूपाने अधूनमधून डोकावायला लागली होती, परंतु ती लागण अजून तिच्या काळ्याभोर लांबसडक केसांना लागली नव्हती. तिच्या सुगरणीच्या हातांची चवदेखील तसूभरही कमी झाली नव्हती, श्रीने स्वतःलाच कबुली दिली. चविष्ट जेवण (आणि दिशाचा अभ्यास) ह्या तिच्या घरी असण्यातल्या सुखाच्या विचाराने श्रीच्या चेहऱ्यावर समाधानाचं स्मित उमटलं.  गेल्या दिवाळीला मित्रमंडळीतल्या बहुतेकांनी, पुण्यातल्या प्रथितयश मिठाई-विक्रेत्यांनी एक्स्पोर्ट केलेली फराळाची बॉक्सेस, ऐटीने विकत मागविली होती.  परंतु घरी आलेल्या मित्रांच्या आणि त्यांच्या बायकांच्या चेहऱ्यावर विस्फारलेला, सगळे पदार्थ घरी केल्याचा अचंबा, तो अजूनहि विसरला नव्हता. वीणाने पाककौशल्याबरोबरच, पदार्थांच्या रचनांतुन तिचं कलाकौशल्यही सादर केलं होतं. खुसखुशीत चकली, खमंग चिवडा, रुमाली करंजी आणि कुरकुरीत अनारशांचा स्वाद घेत सगळ्यांनी वीणाच्या रचना आणि पाक कौशल्याची तोंड फाटेपर्यंत स्तुती केली होती. 'बॉक्सेस मधल्या फराळाला या मेजवानीची सर नसल्याची' हळूच झालेली कुजबुजहि त्याच्या कानावर पडली होती.

व्यावसायिक बाजूने मात्र, इतर मैत्रिणीं नोकऱ्या मिळवून रुळाला लागल्या, तरी वीणाला अजून यश मिळत नव्हतं. नाही म्हणायला श्रीने मनाविरुद्ध आणि तात्पुरता सुरु केलेला 'Casual Job' आता पूर्णवेळ झाला होता.

'हल्ली बाकीचे नवराबायको - घर, Mortgage, SUV ची चर्चा करतात आणि मी मात्र अजूनही ह्या आठवड्याच्या बिलांतच अडकून पडलेय' वीणाचा आवाज चढला. 'मला आता आई बाबांना फोनवर सगळं छान चाललंय हे सांगण्याचाही वीट आलाय. तिकडे सर्वांना वाटत असेल की परदेशात विमानातून उतरलं, की लाल पायघड्या घालून स्वागत आणि पहिल्या दिवशी नोकरी व दुसऱ्या दिवशी गाडी, बंगला हात जोडून उभे राहत असतील', डोळ्यात जमणारं पाणी आवरत तिने गार झालेल्या कॉफीचा कप बाजूला सारला.

श्रीच्या ओठात अनेकदा वापरून जुने झालेले सांत्वनाचे शब्द तसेच अडकले. त्याने निमूटपणे त्याची कॉफी संपवली आणि दोन्ही कप उचलून तो किचन सिंक कडे वळला.

बेडवर पडल्यावर मात्र, दिवसभराचा थकवा असून देखील त्याला झोप लागेना. एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळत त्याच्या मनात एक विचार घोळू लागला आणि लवकरच ठाण मांडून बसला. शक्यता आणि अपयश याचं द्वंद्व करता करता शेवटी पहाटे त्याचा डोळा लागला, पण थोड्याच वेळात गजर वाजून तो उठला तेंव्हा त्याच्या डोळ्यां एक वेगळीच चमक होती.

श्रीच्या मनात काही विचार चालू असल्याचं वीणाच्या नजरेत आलं, पण सकाळच्या घाईत तिने त्याला अडवलं नाही. कामावर निघताना, 'आज रात्रीची कॉफी आपण नक्कीच एन्जॉय करू' असं वीणाला सांगताना त्याच्या आवाजात तिला पूर्वीचा आत्मविश्वास जाणवला. तिचा पुढचा दिवसही पटपट सरला. शाळेनंतरचा दिशाचा अभ्यासही आज चटकन पार पडल्यासारखं वाटलं.

रात्री डायनिंग टेबलवर कॉफीच्या वाफेबरोबर वीणाची उत्सुकताही वाढत होती. समोर ताठ बसलेल्या श्रीच्या हातात एक कागदाची सूरळी होती. घोट घेऊन कप शांतपणे बाजूला ठेवत त्याने ती उलगडली. नकळत वीणा पुढे डोकावली.

'**आपलं RESTAURANT!**' - सर्वात वरती लिहिलेलं ठळक हेडिंग तिला दिसलं. खाली होता बाणांनी एकमेकाला जोडलेला 'bubble diagram' आणि त्यातून विस्तृत केलेला प्रोजेक्ट प्लॅन.

'हा काय कल्पनाविलास?' असं विचारायला तिने मान वर केली पण श्रीच्या चेहऱ्यावरील निर्धार पाहून ती थांबली.

पुढील काही मिनिटं श्री ने तिला त्याची कल्पना समजावून सांगितली. तिच्या साध्याशा जेवणातल्याही कलात्मकतेचं मित्रमंडळींकडून वेळोवेळी होणारं कौतुक आणि एकंदरीतच आयोजनातील क्षमता, व्यवसायात उपयोगात आणण्याची योजना त्याने उलगडून सांगितली.

'लोकं घरासाठी कर्ज काढताहेत आपण बिझनेस साठी काढू' श्री म्हणाला.

'पण मला रेस्टोरन्ट मॅनेजमेंट आणि त्यातल्या इंडस्ट्रियल किचन चा अनुभव कुठेय?' वीणाने चाचरत विचारलं.

श्री ने तिच्यापुढ्यात माहितीचं बुकलेटच ठेवलं. 'तीन महिन्याचा शॉर्ट कोर्स आहे' त्याने प्रोग्रॅम कडे बोट दाखवलं.

'अरे पण घरच्या स्वयंपाकाचं कौतुक निराळं आणि विकत घेतानाच्या अपेक्षा वेगळ्या. विकत नाहीच गेलं म्हणजे?' तिने पुन्हा टाळायचा प्रयन्त केला.

'त्याच्यासाठी ट्रायल-रन करायचा' श्रीने विजयी मुद्रेनं पेपरवरच्या मधल्या एका bubble वर बोट ठेवलं. येत्या दिवाळीला मित्रमंडळी घरी आली की त्यांच्यापुढे 'Home Catering' चा प्रस्ताव ठेवण्याचा त्याचा प्लॅन होता. 'टेलिव्हिजनवरच्या शोज वर दाखवल्याप्रमाणे आपण दोन, तीन 'Set Menu' त्यांना देऊ.  जे आपल्याला पुढे कामाला येतील' तो म्हणाला.

'मला एकटीला जमणं अशक्यप्राय वाटतंय' वीणाने शेवटचं अस्त्र सोडलं.

'अगं चिरायला, कापायला मी मदत करेन की. दिवाळीला अजून दोन महिने आहेत. तोपर्यंत माझं किचन-हॅन्डचं ट्रेनिंग आणि तुझा कोर्स, अर्ध्यापर्यंत आलेला असेल. पुढे Millionaire झालीस की आठवण ठेवून आत्ताचा पगार दे म्हणजे झालं' श्री ने हसत हसत तिला निरुत्तर केलं.

पुढचे दोन महिने गडबडीत पण ध्येयाकडे नजर लावून आनंदात गेले. श्रीचा स्वयंपाकघरात वावर सुरु झाला आणि कांदा चिरताना डोळ्यात आलेलं पाणी तो बाहीने हसत हसत पुसू लागला. सुरुवातीला भाज्यांचे वेडेवाकडे तुकडे करण्यापासून, पट्टीने मोजून सारखी येतील अशी समान कापं करण्यापर्यंत त्याची प्रगती होऊ लागली. पुढे तर निरनिराळ्या प्रकारच्या आकर्षक कडा कातरून गाजर, काकडी आणि टोमॅटोची Salad arrangements रचण्यापर्यंत त्याने मजल मारली. कामावरती, ‘Wollies’ च्या Logistics Manager कडून त्याने भाज्या, फळं, किराणा माल व इतर सामग्रीचे घाऊक बाजारभाव, आणि पुरवठ्याचं तंत्रज्ञान देखील आत्मसात करून घेतलं.

वीणाही कोर्समध्ये रमून गेली. कमर्शिअल किचनच्या विविध उपकरणानी ती हरखून गेली. Deep Fryers, Wok Burners पासून Bain Marie पर्यंत आणि Commercial Ovens, Spiral Dough Mixers पासून विविध प्रकारच्या Food Processors व Chillers मध्ये ती स्वतःला हरवून बसली. केंव्हा भोवतालच्या सहकार्यांच्या कल्पनेतल्या रेस्टॉरंटच्या योजनांनी दडपून गेली, तर कधी एकंदरीतच ह्या व्यवसायातल्या जीवघेण्या स्पर्धेमध्ये आपला निभाव लागेल कि नाही याबाबत साशंक झाली.

बहुतेक रेस्टॉरंटस हे अव्यवस्थित किचन मॅनॅजमेन्ट आणि पदार्थ व गिर्हाईक यांचा ताळमेळ न जमल्याने कोलमडून पडतात, असा टीचर्सचा अनुभव होता. असाच एखादा न चालणारा परंतु साधनसामुग्रीने युक्त असलेला रेस्टॉरंट विद्यार्थ्यांनी चालवायला घ्यावा असा त्यांचा सल्ला होता. सुतळीच्या तोड्यापासून सुरुवात करण्यापेक्षा 'आधी घडवलेल्या रचनेला पुनरुज्जीवन देणं सोयीस्कर', त्यांचं म्हणणं होतं.

'Use your imagination and give it a New Beginning!' they said.

दिवाळी आली आणि फराळाचा स्वाद घेत घेत सर्वच मित्रमंडळींनी 'Home Catering' चा प्रस्ताव उत्साहाने उचलून धरला. पटपट मेन्यू निवडले गेले आणि झटपट पुढच्या काही शनिवार, रविवार साठी जेवणाच्या ऑर्डर्स नक्की झाल्या. श्री आणि वीणा दोघेही कंबर कसून तयार झाले. श्रीचं दिवसभराचं काम आणि वीणाचं कोर्सवर्क असून सुध्दा हे अधिक कामाचं ओझं त्यांना अगदी हलकं वाटत होतं. दर आठवड्याला अभिप्रायही उत्तम येऊ लागले आणि वीणाच्या चेहऱ्यावर थोडंथोडं हसू झळकायला लागलं.

आज कोर्सचा शेवटचा दिवस आणि दुपारी वीणाचं प्रेझेंटेशन, म्हणून संध्याकाळी श्री अधीरतेनेच घरात शिरला. दरवाज्या उघडणाऱ्या दिशाने खांदे उडवले आणि डायनिंग टॅबलकडे बोट दाखवलं. रडवेल्या चेहऱ्याने वीणा समोर ठेवलेलय बंद प्रेझेंटेशन फोल्डरकडे बघत बसली होती.  दिशाने मुकाट्याने टेबलाच्या दुसऱ्या टोकाला बसून आपल्या अभ्यासाच्याच्या पुस्तकात डोकं खुपसलं. थकवा विसरून श्री किचनकडे वळला आणि चहाचे गरम कप घेऊन वीणाच्या जवळ येऊन बसला.

'कोर्स पूर्ण केल्याबद्दल अभिनंदन' त्याने चहाचा कप पुढे केला.

वीणाने नाक मुरडलं, पण चहा मात्र तत्परतेनं घेतला.

दोन घोट घेऊन होईपर्यंत धीर धरलेल्या श्रीने, हिम्मत करून भुवया उडवत तिच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिलं.

'अरे बाकीच्यांची तयारी तू पाहायला हवी होतीस' वीणा म्हणाली. 'रेस्टोरंन्टची नावंच काय पण पदार्थांचीही फॅन्सी-फॅन्सी नावं तयार करून झालीयत त्यांची' ती करवादली. 'माझी मराठमोळी यादी त्यांच्यापुढे अगदीच साधी. त्या साऱ्यांच्या स्पर्धेच्या गदारोळात, आपण हरवूनच जाऊ' तिने निराशेनं डोकं हलवलं.

'व्वा, रेस्टोरंन्टच नाव तर आपल्यला झकासच मिळालं' टेबलावर थाप मारत श्री जवळजवळ ओरडलाच.

'कसं, कुठून?' वीणा त्याच्याकडे दिग्मूढ होऊन पाहताच राहिली.

'अगं, आत्ताच म्हणालीस ना? मराठमोळी म्हणून?'.......मराठमोळी....... मराठमोळी! ' श्री उडी मारतच उठला.

दिशानेही पुस्तकातून डोकं वर काढलं.

वीणाच्या शंका पुढे आल्या.

'अरे हे नाव पुण्यात ठीक आहे, पण इथे? इकडच्यांना वाचता तरी येईल का?'

'त्यांना साधं ‘ताजमहाल’ तरी नीट वाचता कुठे येतंय?' श्री म्हणाला.

'आणि आई, तसं कठीणही नाहीय' दिशालाही आता उत्साह आला. 'मराट सॅफिन' - टेनिस प्लेअर च नाव नाहीका घेत, आणि मोळीला फार फार तर मॉली म्हणतील. मॉली म्हणजे मेरीचंच एक नाव आहे, माझ्या वर्गात आहे मॉली.

'नावाचं आणि पदार्थांचं हे वेगळेपणच आपल्याला 'नेहमीच्या इंडियन' गर्दीतून उठून दिसायला मदत करेल' श्रीच्या चेहऱ्यावर खात्री ओसंडून वाहत होती.

'आणि वडापाव, मिसळ यांच्या नावांचं काय?'

'तिथे तुझी कमर्शिअल आर्ट पणाला लाव' श्री म्हणाला. तो आता माघार घेणार नव्हता. 'पदार्थांच्या अशा इमेजीस बनव, कि पाहूनच तोंडाला पाणी सुटलं पाहिजे'

'जॅपनीज रेस्टोरंन्ट मध्ये असतात तशा' दिशाने लगेच री ओढली, ‘वाचता नाही आलं तर बोट ठेवून दाखवतील’

'आणि पदार्थ तुझ्या हातच्या चवीने विकले जाणारायेत, नावाने नाही. एकदा जिभेवर चव रेंगाळली की बाजी मारलीच म्हणून समज' श्रीने निर्णायक पवित्रा घेतला.

वीणाच्या अंगात त्या दोघांच्या प्रोत्साहनाने थोडंस बळ आलं. तिच्या डोळ्यांपुढे पदार्थांची शृंखला आणि चित्रांची मालिका उमटायला सुरुवात झाली. इतक्या वर्षांची झाकली गेलेली कला उफाळून वर यऊ लागली.

तिने समाधानाने श्रीकडे पाहिलं. तो मात्र कुठल्यातरी विचारात असल्याचं तिला जाणवलं.

'काही राहिलं?' तिने विचारलं.

श्री परत टेबलावर येऊन बसला. 'गेल्याच आठवड्यात ऑफिसमध्ये एक टॉक ऐकला होता, त्याचा विचार करत होतो'

वीणाने मान वळवून कान टवकारले.

'इंटरनेट शॉप्पिंगच्या कॉम्पिटिशनला तोंड देण्यासाठी मोठेमोठी शॉपिंग सेंटर्स वेगवेगळ्या क्लुप्त्या अवलंबतायेत. त्यातली एक म्हणजे 'People go where the action is ' त्यासाठीच हल्ली आपल्याला शॉपिंग सेंटर मध्ये मुलांसाठी मोफत कार्यक्रम, कार्यशाळा, आणि छोट्या स्टेजवर नावाजलेल्या ग्रुप्सचे गाण्याचे कार्यक्रम, अशी रेलचेल दिसते. त्यानिमित्ताने लोक कॉम्पुटर स्क्रिन सोडून सेन्टरमध्ये येतात' श्रीने नव्याने मिळालेली माहिती दिली.

‘आपल्या रेस्टोरंन्ट मध्ये असं काही करता येईल का त्याचा विचार करत होतो'

वीणालाही प्रश्न पडला. कल्पना तर छानच होती. पण रेस्टोरंटमध्ये TV वर बॉलीवूडची गाणी लावण्यापलीकडे तिने तरी काही पाहिलं नव्हतं

दिशा बाजूला येऊन उभी राहिलेली त्या दोघानांही कळली नाही.

'सोप्पय' ती म्हणाली, 'आपले सण साजरे करायचे, तेही ट्रॅडिशनल ड्रेस कोड मध्ये! आपल्याकडे बारा महिन्यात बारा सण सहज निघतील'

आई, बाबांचं लक्ष आता लेकीवर खिळलं होतं.

‘प्रत्येक सणाला वेगवेगळा बेत. गुढीपाडव्याला मोड आलेल्या चण्याची उसळ आणि पन्हं, गणपतीला उकडीचे मोदक आणि ऋषीची कणसं घातलेली भाजी, दिवाळीला करंज्या, अनारशा सकट ताजा फराळ आणि होळी साठी पुरणपोळी!' दिशा ने गिरकी घेत पदार्थांची नामावली गायली आणि तिघांच्याही तोंडाला पाणी सुटलं.

आईबाबांना, लेकीला कुठे ठेवू आणि कुठे नको असं झालं.

'**MarathMoli (मराठमोळी)**' च ओपनिंग थाटामाटात गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर झालं. श्री, चुरीदार-कुरता, वीणा पैठणी आणि दिशा, खणाच्या परकर-पोलक्यात असे हात जोडून स्वागताला उभे होते. मराठी आणि भारतीय मित्रमैत्रिणींनी नटून-सजून गर्दी केली होतीच, शिवाय दिशाच्या शाळेतल्या ऑस्ट्रेलियन मित्रमैत्रिणींचे आईवडील

आणि श्री च्या ऑफिसमधले सहकारीही कुतूहलाने 'न्यू कल्चरल एक्सपीरियन्स' साठी हजर झाले होते. त्यातल्या बहुतेकांना, इंडियात राजमान्य बावीस भाषा आणि तितकेच पूर्णपणे वेगळे खाद्यप्रकार आहेत, आणि त्यातली मराठी ही एक, याच आजच ज्ञान झालं होतं.

सर्वांनी जेवणावर सपाट्याने ताव मारला आणि समाधानाने श्री व वीणाचं अभिनंदन केलं. वीणा आणि श्री आज ओनर्स असल्याचं विसरून विहीण आणि व्याह्यांसारखे विचारपूस करत होते. बारा महिन्यांचे सण आणि 'बेत' वीणाने आधीच तयार ठेवले होते. त्यावर साऱ्यांच्या उड्या पडल्या आणि संपूर्ण वर्षाचं बुकिंग झटक्यात पूर्ण झालं.

सगळे निघाल्यावर श्री, वीणा आणि दिशा जेवायला बसले. पण समाधानानेच पोट भरलेल्या आईबाबांना घास जाईना. समोर बसून, भूक लागल्याने खाण्यात मग्न झालेल्या आपल्या मराठमोळ्या लेकीकडे पाहात, त्यांचा उर भरून आला होता.

**अनिरुद्ध नाडकर्णी**

**सिडनी**

# गप्पा

गप्पांचे विषय किती वेगवेगळे असू शकतात असे विचार माझ्या मनात नेहेमी येतात व त्या विचारांनीच माझे मन थक्क होते व त्यानेच माझे मनोरंजन पण होते .

दोन मुलींच्या गप्पा , दोन मुलांच्या गप्पा , त्या पण त्यांच्या वयानुसार किती विविध विषयांवर असू शकतात त्याला सीमाच नाही .शाळेतले विद्यार्थी , परीक्षा जवळ आलेले विद्यार्थी , तरुण वयातील मित्रमैत्रिणी ,गृहिणी , लहान मुलांचे आई वडील ह्या सर्वांच्या गप्पांचे विषय किती वेगळे असू शकतील ह्याची आपल्याला कल्पना येऊ शकते , नाही असे नाही .

तसेच दोन शिक्षक , दोन शिंपी , दोन डॉक्टर्स , दोन गायक , दोन वकील , ह्या सर्वांच्या गप्पा त्यांच्या त्यांच्या विषयांवर अर्थातच अवलंबुन असणार ह्यात शन्का नाही .

दोन शिक्षक वर्गातल्या हुशार व तसेच काही गुंड मुलांबद्दल बोलतील.नुकत्याच झालेल्या परीक्षेतील काही गमती जमती गप्पांमध्ये रंगत आणत  असतीलच .

दोन शिंपी नवनवीन फॅशनस किंवा त्यांच्याकडून चुका होऊन शिवलेले कपडे कसे बिघडले ह्याच्या गमतीजमती एकमेकांना रंगवून सांगतील .

डॉक्टर्स आपल्या रुग्णांबद्दल एकमेकांना सहसा काही सांगत नाहीत तरी पण काही वेळा कशी न समजण्यासारखी अवघड परिस्थिती झाली होती त्याचे वर्णन व त्याच्या गप्पा रंगू शकतात .

दोन गायक आपल्या रंगलेल्या कार्यक्रमाबद्दल गोष्टी अगदी रंगवून रंगवून सांगत असतील. तसेच कधी चुकलेला स्वर  किंवा चुकलेला ठेका व त्यामुळे आलेले तात्पुरते मानसिक दडपण ह्याच्या गमती एकमेकांना सांगत असतील .

वकिलांच्या गप्पा , दोन पक्षांमधले जीवघेणे वैर रंगत आणत असेल .

माझ्या मनात विचार येतात दोन चोर भेटले तर त्यांच्या गप्पा किती मजेशीर असतील .

काय सांगू -- मी अगदी पकडला जाणार होतो , घरच्या लोकांना जाग येते कि काय अशी भीती मनात दाटून आली पण कसेबसे जीव घेऊन धूम ठोकली व वाचलो खरे .

त्यांचे अनेक मजेशीर अनुभव असणार हे मात्र खरे .

हे झाले लोकांबद्दल .

मला वाटते पक्षी काय बोलत  असतील ? सारखे त्यांचे आवाज , किलबिल चालू असते खरी.  गाडी चालवताना कधीकधी पक्षी रस्त्यावर बसून असतात व अगदी गाडी जवळ आली कि पटकन उडून जातात . त्यांना त्याची भारी मजा येत असावी व ते स्नेह्यांना नन्तर रंगवून सांगत असतील -- काय मी जीव घेऊन शेवटच्या क्षणी एकदम भरारी घेतली व सुटकेचा श्वास घेतला ,पण काय मजा असते त्या उडण्यात .

कधीकधी दिवसभर इकडे तिकडे उडत उडत भटकलो पण काही कुठे छान फळं म्हणून खायला मिळाली नाहीत. कधी ते एकमेकांना , मित्रांना सांगत असतील -- अमुक अमुक झाडावर जा , लांब असले तरी भरपूर फळे लागली आहेत तिकडे . रोज रात्री कोणत्या झाडावर आज झोपायचे , कोणत्या मित्रासाठी शेजारच्या फांदीवर जागा राखून ठेवायची ह्याचे विचार डोक्यात असणार व ते एकमेकांना सांगितलेच पाहिजे

मालकाबरोबर फिरायला गेलेली कुत्री एकमेकांना भेटतात . पटकन आपल्या मालका बद्दल काहीतरी सांगत असतीलच -- माझा मालक किती माझी काळजी घेतो , घरी मुलं  कशी माझ्याशी चेंडू खेळतात , खायला कसे छान छान मिळते हे सारे  भुंकून भुंकून पटकन नक्कीच सांगत असतील असे मला वाटते .

झाडं  , फुले  पण सुखदुःखाच्या गोष्टी शेजारच्या झाडांना कळवीत असतील . खूप उन्हाची कटकट , थुंडगार वाऱ्याच्या झुळकेची शीतलता ह्याबद्दल त्यांच्या गप्पा होत असतीलच .पाऊस आवडत असला तरी कधीकधी मुसळधार पावसाचा कसा त्रास सहन करावा लागला हे सांगून एकमेकांची सहानुभूती मिळवीत असतीलच . मोठ्या मोठ्या वृक्षांना इवल्या इवल्या रोपांची , नाजूक नाजूक वेलींची काळजी वाटत असेल .

झाडांच्या फांद्यांवर येणाऱ्या , झोपणाऱ्या पक्ष्यांच्या गप्पा ऐकण्यात त्यांना रस असेल . रस्त्याच्या बाजूला असलेल्या वृक्षांना रस्त्यावरच्या वाहनांच्या रहदारीची करमणूक होत असेल . पायी रमत गमत  फिरायला जाणाऱ्या लोकांच्या गप्पांमधून त्यांना कितीतरी गमतीच्या गोष्टी ऐकू येत असतील .मोठ्या वृक्षांचा अनेक वर्षांचा अनुभव असणार .

नदीत , समुद्रात पोहणारे मासे , त्यांची मजा न्यारीच असत असेल. लहान मासे त्यांना वाटत असलेली मोठ्या माशांची भीती बोलून दाखवीत असतील . एकमेकांना बजावून सांगत असतील -- जपून रहा मोठ्या माशांपासून असा इशारा कळवळीने देत असतील . तसेच मासे पकडणारे कोळी व त्यांची जाळी , त्यापासून कसे दूर रहायचे , हा धोका कसा टाळायचा हे विचार किती सतावीत असतील. अमुक अमुक छोटा मासा अशात दिसला नाही , कोणी त्याला पहिला का ? पोहत पोहत फार दूर गेला , हरवला , का बिचारा जाळ्यात अडकून पकडला गेला अशी एकमेकांची काळजी करत असतील .

गप्पाटप्पा हा सर्वांच्या नुसत्या करमणूकीचा भाग आहे असे नव्हे व त्यात वायफळ गप्पा मारून वेळ वाया जातो असे वरकरणी वाटत असले तरी गप्पा हे मानवी मनासाठी अतिशय महत्वाचे आहे असे मला वाटते . मैत्रिणींशी मनमोकळ्या गप्पा मारणे ह्याच्यात मन किती रंगून जाते , वेळ किती छान जातो , मनाला एक प्रकारचा हुरूप , उत्साह वाटतो . सुखदुःख मैत्रिणींच्यात जरूर जरूर वाटावी , त्यामुळे सुखाचा आनन्द दुगणित होईलच पण दुःखाचे ओझे नक्कीच हलके होईल व दुःख सोसण्याचे बळ नक्कीच वाढेल. आपण एकटे नाही , आपल्या सुखदुःखाच्या चार गोष्टी ऐकायला कोणीतरी जवळचे आहे हेच किती महत्वाचे असते . आपण पण कोणाच्या सुखाने आंनदी झालो व कोणाच्या संकटाच्या काळात त्याला धीराचे दोन शब्द सांगितले तर त्याचे मोल अनमोल .

त्या व्यक्तीचे दुःख आपण दूर करू शकूच असे जरी नाही तरी त्याच्या मनाचा भार हलका करता आला तर त्याचे समाधान खरोखरच फार मोठे .

अनेक मित्रमैत्रिणी असणे हीच खरी श्रीमंती .

सौ. शोभा लिमये .

# झोप

अन्न , वस्त्र , निवारा ह्या माणसाच्या तीन मूलभूत गरजा समजल्या जातात पण त्या बरोबर  मला आणखी एक तितकीच महत्वाची वाटणारी गरज म्हणजे झोप . प्रत्येकाची झोपेची गरज वेगळी असते हे खरे , काही लोकांना थोडीशीच झोप पुरते व ते लगेच ताजे तवाने दिसतात व उत्साहाने कामाला  लागतात . अशा लोकांचे मला भारी आश्चर्य वाटते कारण माझा अनुभव अगदी निराळा असतो. एक वेळ भूक सहन करता येईल मला पण झोप हवी तेव्हढी न मिळाली तर असा काही त्रास होतो मला कि मी अगदी हैराण होऊन जाते

झोपेचे बरेच महत्वाचे असे शास्त्र आहे . झोप व स्वप्नं  ह्यांच्या बाबतीत चालणारे मेंदू मधले रात्रीतले बदल , बंद डोळ्यांच्या मागे मधेअधे बुबुळांची जलद गतीतली हालचाल. , श्वासोश्वासातील मंद गती , शरीराचे स्नायू शिथील पडणे   हे सर्व बदल शास्त्राप्रमाणे होतात व हे सर्व बदल झोप लवकर लागावी ह्या दृष्टीने उपयुक्त असतात . झोपेच्या वेळेमध्ये नियमितपणा असणे उत्तम, तसेच चहा , कॉफी , मद्यपान अशी उत्तेजक पेये झोपेच्या आधी सेवन केल्यास लवकर झोप  लागत नाही .मानसिक ताण , काळजी , अति विचार हे पण घातक. झोपताना मन शांत असावे व त्या दृष्टीने प्रयत्न व उपचार करणे हे उत्तम .

झोप किती तास असावी हे वयाप्रमाणे बदलत असते. लहान मुलांना ज्यास्ती तास झोपेची गरज असते पण नन्तर वय वाढेल तशी कमी झोप पुरते , तरी पण 6 ते 8 तास झोप असावी. पुरेशी झोप न मिळाल्यास मधुमेह , डिप्रेशन असे काही आजार होण्याची शक्यता वाढते . काम करण्याचा उत्साह कमी होऊन कार्यक्षमता कमी होते. कितीतरी लोकांना कामाला  जाणे अवघड होऊन बसते व अनेक वेळा सुट्ट्या घ्याव्या लागतात. काही लोकांना अति झोपणारे लोक म्हणजे वेळ वाया घालवणारे , आळशी , खुशालचेंडू , वेळेची किंमत नसणारे असे वाटतात, परंतु झोपेअभावी थकल्या मनाने , अर्धवट उत्साहाने कसेबसे काम उरकून त्यात चुका होण्याची शक्यता नक्कीच वाढते. त्यापेक्षा शांत मनाने व उत्साहाने कामं  केल्यास कार्यक्षमता नक्कीच वाढते व त्या कामांचे जास्त कौतुक होते.

काही लोकांना निद्रानाशाचा विकार जडलेला असतो व मग त्यांना लवकर झोप न लागल्यामुळे फार त्रास होतो. झोप न झाल्यास माझे तर डोकं दुखायला लागते दुसऱ्या दिवशी . मग डोळ्यांची आग व चुरचुर सुरु होते . डोळे नकळत सारखे चोळले जाऊन डोळ्यांच्या भोवती त्वचा लाल लाल दिसायला लागते .मनास थकवा जाणवतो . डोकं दुखून कधीकधी मळमळायला लागते . एकंदरीतच हे सर्व सुरु झाले कि कंटाळा

येऊन गळून गेल्यासारखे वाटते . कशातच उत्साह म्हणून वाटत नाही .शेवटी एकदा एक रात्री मस्त झोप मिळाली कि मग दुसऱ्या दिवशी परत व्यवस्थित गाडी मार्गाला लागते.

निद्रा देवीची कृपा अति महत्वाची असे मला पटून चुकले आहे. हा माझा स्वतःचा झोपेबद्दलचा अनुभव. म्हणून मला अन्न , वस्त्र ,निवारा व निद्रा ह्याचे महत्व पटलेले आहे

जय देवी निद्रेची देवी
तव कृपा नित्य रात्री
मजवरती असावी

डोके उशीवरती
टेकता क्षणी यावी
निद्रा मम लोचनी

प्रार्थना मम मनी
गोड गोड स्वप्नांची
नगरी ती दिसावी

डॉ सौ शोभा लिमये

# हॉटेल आरोग्य

रविवारी दुपारी भरपूर , पोटभर जेवण झाले व मग नन्तर गप्पा मारत सगळे जण लोळत पडलो . तरीपण संध्याकाळी कुठे तरी छान हॉटेल मध्ये जेवायला जावे असा विषय सुरु झाला , गप्पा रंगात आल्या , प्रत्येक जण वेगळे वेगळे हॉटेल्स ची नावे सुचवीत होते हळूहळू सर्वांच्या डोळ्यावर निद्रेचे राज्य येऊ लागले , आवाज जड होऊ लागले. तशात लक्षात आले कि आज गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर देशपान्डे नावाचे एक स्नेही नवीन हॉटेल उघडणार आहेत. तसे ते हॉटेल फार काही लांब नव्हते . त्यांनी पण जरूर या पहिल्या दिवशी असे आग्रहाचे निमंत्रण दिलेले होते त्याची एकदम आठवण झाली व त्यांच्या हॉटेल आरोग्य मधे जावे असे ठरले .

माझे विचार चक्र सुरु झाले...कसे असेल हॉटेल? आरोग्य हॉटेल नाव तर छान आहे जेवण कसे असेल. काय काय पदार्थ असतील , आपण काय खावे , अशा विचारांच्या तंद्रीत मी गेले. देशपान्डे गेले काही आठवडे गडबडीत होते , नवीन हाटेल सुरु करायचे म्हणजे अनेक कामं त्यांच्या मागे , त्यामुळे त्यांची भेट किंवा निवान्त गप्पा अशा झाल्याच नव्हत्या . त्यामुळे हॉटेल बद्दल तशी काही जास्ती माहिती नव्हती , काहीच कल्पना नव्हती .

माझ्या कल्पना जोरदार भरारी घेत होत्या. आम्ही दोन चार मैत्रिणी गेलो , पोहाचलो तर काय प्रथम हात धुवून मग टेबल वर आम्हाला बसवले .

एक फॉर्म भरायला दिला सर्वाना . आश्चर्यच वाटले. हॉटेल मध्ये वातावरण छान होते , सगळीकडे फुलदाण्या , पडदे , मंद आवाजतले संगीत असे सर्व प्रसन्न वातावरण होते , त्यामुळे मन एकदम खुश झाले पण हा कसला फॉर्म , ही काय कटकट असे वाटले खरे वाचून पहिले तर गम्मतच वाटली. तुमचे वजन , तुमची उंची , काही रोग आहेत का , म्हणजे रक्तदाब , मधुमेह , अशी वैयक्तिक माहिती विचारली होती

खाली ठळक अक्षरात लिहिलेले होते -- आम्ही तुमच्या आरोग्याची व्यवस्थित काळजी घेऊ व त्याप्रमाणेच तुम्हाला योग्य असे जेवण देऊन तुम्हाला तृप्त करूतुमचे आरोग्य सांभाळणे हेच आमचे ध्येय .

वाचून आश्चर्य वाटले व आनन्द पण झाला

आमच्यातल्या एका मैत्रिणीचे वजन जरा जास्तच होते . तिला पुऱ्या न देता साध्या फुलक्या , न तूप लावता मिळाल्या . भरपूर सलाड , व भाज्या दिल्या गेल्या . शेवटी फलाहार समोर आला . वजन कमी कसे करावे ह्याचे भरपूर सल्ले फुकट मिळाले , नशीब समजा , बागेत चक्कर मारून या असे नाही सांगितले .

मला जरा मधुमेह असल्याचे नुकतेच समजले होते , झाले , श्रीखंड पुरी इतरांना दिली जात होती , मला हे कसे घातक असते व ते टाळणे कसे जरुरी आहे अशा अर्थाचे एक पत्रक वाचायला दिले व अगदी साधे म्हणजे पोळी भाजीचे जेवण समोर आले . कोशिंबीर , लोणचे मात्र होते चवीला

तिसऱ्या मैत्रिणीला रक्तदाबाचा विकार, कमी मीठ घातलेले साधे  आळणी जेवण तिच्या समोर आले . ती अगदी रडकुंडीलाच आली

देशपांडे खास आम्हाला भेटायला आले. त्यांच्या हॉटेलचा उद्देश लोकांचे आरोग्य सांभाळणे आहे . हाटेल मध्ये वरचेवर जेवून लोकांचे आरोग्य किती बिघडू शकते , त्याचे दुष्परिणाम कसे होतात व त्यांचे आरोग्य सांभाळणे  हा त्यांच्या नवीन हॉटेलचा उद्देश किती उत्तम व लोकोपयोगी आहे हे ते आम्हाला सांगत होते.गुढी पाडव्याच्या दिवशी असे लोक कल्याणाचे किती महत्वाचे समाजउपयोगाचे कार्य त्यांनी हाती घेतले आहे , त्याचे महत्व ते सारखे सांगत होते. ते सर्व जरी पटत होते तरी आमची नाराजी चेहऱ्यावर दिसत होती. शेवटी मला रहावले गेले नाही. मी जोरजोरात ओरडायला लागले," आज गुढी पाडवा , नव  वर्षाची सुरुवात , नव वर्षाचा पहिला दिवस , मला आंनदात साजरा करायचा आहे , आज मी गोडाधोडाचे खाणार , मला श्रीखंड पुरी खायची आहे. मला दुसऱ्या हॉटेल मधे  जेवायला जायचे आहे." असे म्हणत मला जाग आली

सर्व मैत्रिणी खदखदा हसायला लागल्या

खा बाई तुला काय हवे ते खा

श्रीखंड द्या ग हिला लवकर खायला

अशी गुढी पाडव्याची मजा झाली

सौ शोभा लिमये

# मी दिलेली लाच

अनेक वेळा विविध कार्यालयात आपण आपल्या कामासाठी जात असतो. अशी कामे पटकन विनासायास झाली की आपल्या आनंदाला पारावार रहात नाही. दिवस सार्थकी लागल्यासारखे वाटते.ज्या कर्मचा-याने,अधिका-याने आपल्याला उत्तम सेवा दिलेली असते त्याचेविषयी मनामध्ये कृतज्ञतेची भावना निर्माण होते. काहीतरी नवलाई घडल्या सारखे,अघटीत घडल्या सारखे वाटते. असे आपणास का वाटते? कारण हेलपाटे किंवा खेटे मारल्याशिवाय कुठलेच काम होत नाही. विशेषतः सरकारी खात्यांबाबत असा अनुभव नेहमी येत असतो.काही ना काही खुसपटे काढून तुम्हाला जेरीला आणले जाते. सरकारी काम आणि सहा महिणे थांब हे आता अंगवळणी पडले आहे.पण चिरिमिरी किंवा लाच देऊन विनासायास आणि त्वरीत कामे करुन घेणारी बिलंदर मंडळी जेंव्हा पहातो तेंव्हा आपण मनातल्या मनात चडफडतो. उद्विग्न होतो.स्वतःला असहाय समजतो. पण आता मी माझा अनुभव तुम्हाला सांगणार आहे तो वाचून आपल्या मनाला नक्की उभारी येईल.थोडी सजगता आणि क्षात्रवृत्ती दाखविली तर आपण ही दप्तर दिरंगाई आणि लाचखोरीची वीषवल्ली नामशेष करु शकू त्यासाठी ACB अर्थात Anti Corruption Burrow आपल्याला सर्वतोपरी सहकार्य करायला नेहमी तत्पर असते. हे सांगण्यासाठी मी माझा अनुभव येथे लिहित आहे.

**एका लाचखोर सरकारी कर्मचा-याला मी ACB (Anti Corruption Bureau) च्या जाळ्यात अडकविले त्याची कथा.**

२०१४ सालात एका जमिनीचा फाळणी नकाशा मला हवा होता त्या कामासाठी मी पुण्याहून सातारच्या भूमिअभिलेख कार्यालयात वारंवार चकरा मारत होतो. पण संबंधीत सर्व्हेअर मला काही दाद देत नव्हता.त्याला अपेक्षित माझा ॲप्रोच नसावा त्यामुळे प्रत्येक वेळी नवनविन सबबी,कामाचा लोड आहे,जुने रेकॉर्ड शोधायला सद्या वेळ नाही,नंतर या. अशा त-हेची उत्तरे ऐकून मी दरवेळेस परत जात असे. एकदा मी त्याला कळवळून म्हणालोही की साहेब मी या कामासाठी पुण्यावरुन येत असतो माझा पैसा आणि वेळ किती जात असेल याचा काहीतरी विचार करा. यावर तो म्हणाला की जुने रकॉर्ड शोधावे लागेल आणि ते माझ्याशिवाय कोणाला जमणार नाही. मी म्हणालो की शोधणावळीचा खर्च किती असतो तो मी भरायला तयार आहे पण आता एक निश्चित तारीख द्या आणि माझे हेलपाटे थांबवा कारण पुढचे मोजणीचे काम त्या फाळणी नकाशाअभावी खोळंबले आहे. माझी ही अर्जन्सी आणि असहाय अवस्था हेरुन त्याने माझ्याकडे या कामाचा रु.१२०००/-खर्च येईल असे सांगितले. हे ऐकून मी हादरलोच आणि अभावित पणे"एवढा खर्च"असे उद्गारलो.माझी ही प्रतिक्रिया त्याला अजिबात सहन झाली नाही. यावर तो “खर्च कसा रास्त आहे. जरा बाहेर चौकशी करा.

तुम्हाला काही अनुभव नाही. परत माझ्याकडे येऊ नका. कुणाकडून काम करून घ्यायचे ते घ्या परत मला भेटू नका" असे अद्वातद्वा बोलू लागला. माझ्या सारख्या सुशिक्षित माणसाशी जर हा असा वागत असेल तर अशिक्षित,अल्पशिक्षित लोकांना हा किती नाडत असेल या विचाराने मीअस्वस्थ झालो. याला चांगला धडाच शिकवितो हा निश्चय करुन पण वरकरणी त्याला गोंजारुनच त्याचा निरोप घेतला.

ऑगस्ट २०१४ला मी साता-यात आलो असताना मित्राने त्याच्या ACB च्या साहेबांशी चांगले संबंध असणाऱ्या एका मित्राशी ओळख करून दिली. माझ्या डोक्यात एकदम ट्यूब लागली. आणि मी तडक ACB ऑफिस गाठले व भूमी अभिलेख कार्यालयातील मला आलेला अनुभव पोलिस अधिक्षक साहेबांचे कानावर घातला. त्यांनी लेखी तक्रार केली तर तपास यंत्रणा कार्यान्वित केली जाईल असे अश्वासन दिले त्या प्रमाणे तेथे बसूनच अर्ज लिहिला व सादर केला.

दुसरे दिवशी सांकेतिक स्थळी इन्स्पेक्टर साहेबांच्या मार्गदर्शना नुसार मी भेटी साठी गेलो. तेथे एका साक्षिदारांची माझी ओळख करुन दिली व आरोपातील सत्यासत्यतेच्या पडताळणी साठी संबंधीत कर्मचा-याची गाठ घेण्याचे नियोजन करण्यात आले. छोटा हाय पॉवर टेपरेकॉर्डर माझ्या गळ्यात शर्टाचे आत अडकविण्यात आला व आम्ही दोघे स्वतंत्र वहानाने अंतर ठेवून व अनोळख्या सारखे त्याच्या ऑफिसवर गेलो पण त्याच्या टेबलावर तो नव्हता चौकशी केल्यावर कळले की त्याची वाईला बदली झाली आहे. मी बाहेर येऊन त्याला मोबाईल वर फोन केला.

मी: (त्याचे नाव घेऊन)साहेब का?

तोः होय.कोण बोलतंय?

मीः मी प्रकाश शिंदे बोलतोय.तुमची वाईला बदली झाली मला आता कळले.
आता माझे काम कोण करणार?
जाण्यापूर्वी माझं काम केलं असतं तर बरं झालं असतं

तोःतुम्ही कुठे करा म्हणून सांगितले?तुम्हीच उशीर करताय.माझं ऐकलं असतं तर केंव्हाच ते झालं असतं.

मीःसाहेब एकदाच काय ते फायनल सांगा मी त्यासाठीच आज आलो होतो.किती द्यायचे?

तो:अशा गोष्टी फोनवर बोलायच्या नसतात.तुम्हाला जे सांगितलंय त्यात काही कमी नाही.फोन बंद करा.

मी:सॉरी.इथं कोणी नाही.मी तुमची गाठ घ्यायला वाईला येतो तिथंच प्रत्यक्ष बोलू.

त्या नंतर त्याने मला दुपारी ४वा.ची वेळ दिली व ऑफिसचे लोकेशन दिले.

काम ५०% च झाले होते.त्यामुळे निराशा झाली.पुन्हा संकेत स्थळी आलो.अधिका-यांनी रेकॉर्डींग ऐकले.त्याचे लेखन केले गेले.माझे व साक्षिदारांचे दोन वेगवेगळी लेखी निवेदने घेतली व दुपारी वाईला जाण्याचे नियोजन ठरले. अशासकीय गाडीने मी,साक्षिदार,व ACB चे नागरी वेषातले काही कर्मचारी आम्ही दुपारी ३.३०ला पोहचलो गळ्यात सकाळ सारखा टेप रेकॉर्डर अडकविला होताच. शहराच्या अलिकडेच मला व साक्षिदारास उतरविले तेथून चालतच त्याच्या ऑफिसला गेलो.

मला पहाताच तो बाहेर आला.चहासाठी आम्ही समोरच्या  हॉटेलमध्ये गेलो.मुख्य संवाद

तो:(साक्षिदाराकडे पाहून)हे कोण?

मी: हा माझा मावस भाऊ वाईचाच आहे.मला वाईतलं काही माहित नाही म्हणून याला बरोबर घेतले.

तो:वाईत कुठे रहाता?मला वाईतली माहिती आहे मी वाईचाच आहे.

(इथं मला धडकी भरली.पण सुदैवाने साक्षिदाराचे पाहुणे वाईत होते तोच पत्ता आणि काही नावे सांगितली.साक्षिदाराने न गडबडता सफाईदार पणे त्याची खात्री पटविली.मी चहा पितापिता मुद्याला हात घातला.

मी:साहेब माझं काम कधी करणार?आणि तुम्हाला या कामाचे किती द्यायचे ते नक्की सांगा.

तो:मी खूप कमी सांगितलेत.माझ्या ब्लेडची तुम्हाला धास्ती वाटतीय पण वरच्या साहेबाकडे गेलात तर त्यांच्याकडे करवतच असती.

मी:पण आकडा सांगा ना फिक्स.

तो:बारा हजार

मी:अहो मी रिटायर्ड माणूस थोडा विचार करा.दहा हजारात भागवा.

तो: ठिक आहे.,(मानेने पण सहमती)

मी:किती दिवसांनी परत येऊ?

तो:१५दिवसांनी एकटे या. पैसे घेऊन.

आम्ही चालत सावध पणे दूरवर आडबाजूला असलेल्या गाडीत !बसून गणपतीचे दर्शन घेऊन सातारला संकेत स्थळी आलो.पहिल्या सत्रात झालेल्या प्रमाणे सर्व सोपस्कार पूर्ण करुन मी पुण्यास परतलो.पडताळणी १००%यशस्वी झाली होती.

१५ दिवसांनंतरही त्याचा फोन आला नाही तरीही रक्कम घेऊन जायचे ठरले.मी नियोजना प्रमाणे संकेत स्थळी आलो.दोन साक्षिदार व काही कार्यालयीन नागरी वेषातला स्टाफ सर्वांचा परिचय करुन दिला गेला.रु.१०००च्या १०नविन नोटा त्यांचे नंबर्स लिहून त्यांना फ्लूरोसेंट पावडर लावून त्या माझ्या वरच्या खिशात ठेवण्यात आल्या.ती पावडर नजरेला दिसत नाही.हाताला लागत नाही पण त्याला लागलेल्या हाताचे ठसे मात्र अंधारात स्पष्ट दिसतात.त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.कोरा टेप रेकॉर्डर गळ्यात घातला.कारवाई पूर्वी तो चालू कसा करायचा हे तंत्र माहित होतेच.सर्वांनी ऑफिसचे बाहेर पांगून उभे रहायचे व मी दिलेली लाचेची रक्कम त्याने स्वीकारल्यावर मी डाव्या हाताने माझा चष्मा काढणार ही इशारत झाल्यावर त्याला रंगे हात पकडायचे असे ठरले.

मी एकटाच त्याच्या ऑफीस मध्ये गेलो.मला बसावयास सांगितले.सुमारे अर्ध्यातासाने मधल्या सुट्टीत तो बाहेर आला.सोबत एक पक्षकार(सावज)होता.आम्ही तिघे त्याच्या गाडीत बसलो.तो ड्रायव्हर सीटवर तो दुसरा गृहस्थ त्याच्या शेजारी व मी मागे.गाडी गावातून नेली.कशाचे तरी त्या दोघांचे बोलणे चालले होते.त्याला मध्येच उतरायचे होते.तो उतरल्यावर मला पुढे बोलाविले.गाडीतच आमचे संभाषण सुरू झाले.

तो:आणली का रक्कम?

मी:हो.

मी १०००/-च्या १०नोटा काढून त्याला दिल्या.त्याने लगेच त्या आपल्या वरच्या खिशात ठेवल्या मी म्हणालो अहो साहेब किती आहेत नीट मोजून घ्या परत घोळ नको.असे म्हंटल्यावर त्याने त्या परत काढल्या व १,२,३...अशा मोजून परत खिशात ठेवल्या मी म्हंटले किती आहेत तो म्हणाला आहेत दहा हजार.

मी डाव्या हाताने माझा चष्मा काढताक्षणी इन्स्पेक्टर साहेबांनी ड्रायव्हर साईडचे दार वाजवायला सुरुवात करुन गाडी थांबवायला सांगितले.त्यांना बघताच या माणसाने गाडी सुसाट नेली आणि माझ्याकडे खाऊ का गिळू अशा खदिरांगार नजरेने बघून शिंदे कोण आहेत हे लोक?हे ACBचे लोक आहेत ना?त्याने गाडीत नुसता हैदोस मांडला.मी म्हंटले मला नाही माहित तुमच्याच ओळखीचे असतील नाही तर कुणीतरी लीफ्ट मागत असेल.पण माझे बोलणे त्याला पटले नाही.तो पुन्हा पुन्हा मला तुम्ही ACB का गेलात याचा जाब विचारत होता आणि मी म्हणत होतो अहो खरच मला काही माहित नाही ते  ACB का काय म्हणताय ते कुठे आहे तेही माहित नाही.मी परोपरीने

त्याला सांगत होतो पण तो पुरता घाबरला होता आणि त्यामुळे बेदरकारपणे गाडी त्या ट्रॅफिक मधून पळवत होता.हा आता मोठा अपघात करणार या धास्तीने माझी पाचावर धारण बसलेली.पाचगणीच्या घाटाच्या दिशेने जेंव्हा गाडी जायला लागली तेंव्हा तर मला घाम फुटला हा आता घाटातून गाडी दरीत कोसळवणार याची खात्रीच पटली.त्याने शेवटी मला गाडीतल्या गणपतीवर हात ठेऊन मुलांची शपथ घेऊन हे ACBचे लोक नाहीत असे म्हणायला सांगितले.काय करावे हे कळेना पण विचार करायला वेळ नव्हता.गणरायाची मनोमन क्षमा मागून मी खोटी शपथ सुद्धा घेतली कारण या त्रस्थ समंधाला शांत करणं आवश्यक होतं.दरम्यान आपण समजा पकडले गेलोच तर लाचेची रक्कम आपल्या कडे सापडायला नको म्हणून त्याने त्या हजाराच्या दहा नोटा चुरगुळून खिडकीच्या बाहेर फेकून दिल्या.आणि गाडी मागे कोणी पाठलागावर नाही असे बघून घाटाच्या पायथ्याला असलेल्या एका कॉलनीत घुसविली आणि वळणं वळणं घेत एका कोप-यात उभी केली.मी म्हंटले तुम्ही उगीच पैसे फेकून दिले.राहूदे माझं काम.आज तुम्ही ॲक्सिडेंटच करत होता.मला आपलं स्टँडला सोडा.आणि मला जाऊदे पुण्याला.सुमारे अर्ध्यातासाने त्याने गाडी सुरू केली आणि मेन रोडच्या एका कॉर्नरवर त्यांने वेग कमी केला आणि इथे शोधा तुमचे पैसे असे म्हणून मला गाडीतून उतलविले आणि मला तिथेच ठेऊन सुसाट निघून गेला.मी पैसे शोधत होतो तेवढ्यात पाचगणी घाटाच्या दिशेने गेलेले शोधपथका पैकी दोघे तिघेजन ज्यात इन्स्पेकटर साहेबही होते, ते सर्वजन मी रस्त्यात काहीतरी शोधताना दिसलो आणि थांबले. सर्व नोटा सापडल्या कारण त्या नव्या को-या होत्या आणि चुरगळल्या मुळे एकमेकात अडकल्या होत्या.शिवार नुकतीच पावसाची भुरभुर येऊन गेल्यामुळे ओलसर गाजरगवतातून त्या वा-याने उडल्या नहीत आणि रस्त्याच्या कडेला कुणाच्या नजरेतही पडलया नाहीत.

नोटांचा जागेवर पंचनामा केला.पथिकांच्या साक्षी घेतल्या.आणि आम्ही त्याच्या ऑफिसकडे गेलो.दिसणार नाही अशा पद्धतीने पांगून उभे राहिलो.तो ऑफिस मध्ये आला नव्हता.थोड्यावेळाने कुणीतरी त्याला दुचाकीने सोडले.तो ऑफिसच्या आवारात शिरताच त्याला ACBने ताब्यात घेतले.एव्हाना उपअधीक्षक साहेबही पोहचले होते. त्याच्या अधिका-यास झाल्या प्रकाराची अधिकृत माहिती दिली.एका हॉटेलवर त्याला नेण्यात आले.सर्व स्क्सॉड व मीही तेथेगेलो.झडती,पंचनामा,जाबजवाब,रेकॉर्डींगचे लेखन ही खूप मोठी प्रोसेस असते.

सदरची केस स्टँड झाल्यापासून अनेक जजेस बदलत राहिले.मी स्वतःच ३जजेसला सामोरा गेलो. आपली न्याय प्रक्रीया फार लेंदी आणि क्लीष्ट आहे.मी फिर्यादी असूनही उलट तपासणी दरम्यान मी स्वतः आरोपी आहे असे वाटत होते.काही वेळा तर असे वाटले की आपल्यालाच शिक्षा होऊ नये म्हणजे मिळवली आणि चोर सोडून संन्याशाला फाशी ही केवळ म्हण नसून वस्तुस्थितीच असावी. न्याय देवतेच्या

डोळ्यावरील पट्टीचा तो तर अर्थ नसेल?असे नकारात्मक विचार मनात येत.परंतु ACB च्या  पोलीस उप अधिक्षक तसेच पोलीस इन्स्पेकटर यांच्या टीमने शोध प्रक्रीयेत परफेक्ट कार्यवाही आणि बिनचूक पंचनामे  केल्यामुळे आणि जिल्हा सरकारी वकील तसेच सहाय्यक सरकारी वकील यांनी तर्कशुद्ध पद्धतीने व समर्थपणे फिर्यादीपक्षाची बाजू लढविल्यामुळेच फिर्यादीला न्याय आणि अपराध्याला शिक्षा मिळाली.देर है पर अंधेर नही याची प्रचिती आली.

या खटल्याचा निकाल नुकताच म्हणजे २६फेब्रुअरीला लागला व आरोपीला ४वर्षाची शिक्षा व रु.१०,०००/-दंड न भरल्यास आणखी २ महिण्याची शिक्षा ठोठाविण्यात आली.

श्री. प्रकाश शिंदे


# बालविभाग

ॲडलेड मराठी विद्यालयातील विद्यार्थी ध्रुव आणि नंदिनी काकडे ह्यांनी खास गुढीपाडव्यानिमित्त चित्रं काढली आहेत आणि मराठीतून सणाची माहिती दिली आहे. तसेच त्यांच्या पालकांनी ध्रुव आणि नंदिनीने आतापर्यन्त साजऱ्या केलेल्या गुढीपाडव्याचे एक सुरेख कोलाज करून दिले आहे. ध्रुव, नंदिनी, प्रणव आणि कामिनी ह्यांचे  मनापासून आभार.



# ध्रुव काकडे







हिंदू नवीन वर्षाचा पहिला दिवस गुढी पाडवा म्हणून साजरा केला जातो. तो चैत्र महिन्यात असतो. गुढी ही विजयाची आणि भरभराटीच प्रतीक असते. गुढी बनवण्यासाठी लागणारी सामग्री व ते कशाचे प्रतीक आहेत ते खालील यादित दिले आहे.

| सामग्री | प्रतीक |
|---|---|
| १) वेळूची काठी किंवा लाकडी उंच काठी | सामर्थ्य |
| २) तांब्याचा किंवा इतर धातूचा तांब्या / कलश | यश |
| ३) जरीची साडी किंवा देवपूजेसाठी वापरतात ते लाल कापड | वैभव |
| ४) झेंडूच्या फुलांचा आणि आंब्याच्या झाडांच्या पानांचा हार किंवा दुसऱ्या फुलांचा हार | मंगल |
| ५) साखर गाठींचा हार | नात्यातील व जीवनातील गोडवा |
| ६) कडूलिंबाच्या झाडाची फांदी | निरोगी आरोग्य |
| ७) लाकडी पाट किंवा चौरंग | स्थैर्य |
| ८) नारळ / श्रीफळ | सिद्धी व मानवी अहंकार |
| ९) विड्याचे पान | सन्मान, आश्वासन व प्रेम |
| १०) सुपारी | सकारात्मक ध्येय |
| ११) हळदी कुंकू | भरभराटी व नवऱ्याच दिर्घायुष्य |
| १२) दोरी किंवा धागा | सर्वांना एकत्रीत ठेवणे |
| १३) कापड खण | वैभव |

## नंदिनी काकडे





# गुढी पाडवा

गुढी पाडवा या सणाला वर्षप्रतिपदा असेही म्हटले जाते. गुढी पाडवा हा साडे तीन मुहूर्तातील एक शुभ मुहूर्त आहे. ह्या विशेष सणाला लोक चांगल्या कामांची सुरवात करतात. लहान मुलांना गाठी हार व साखरेच कंकण भेट म्हणून देतात. तसेच गमती जमतीत एकमेकांना विचारतात," आज काय आहे?" आणि उत्तर "गुढी पाडवा" आल की म्हणतात " नीट बोल गाढवा."

गुढी पाडव्याच्या दिवशी आम्ही सकाळी लवकर उठतो, घर स्वच्छ करतो आणि नवीन कपडे घालून तयार होतो. आमची आई गोड गोड श्रीखंड, पुरी, भाजी, भजी व पापड या स्वयंपाक बनवते. मी अंगणात सडा रांगोळी करते. माझे बाबा आणि दादा झेंडूच्या फुलांचे आणि आंब्याच्या झाडाच्या पानांचे हार बनवतात. त्यांचे तोरण दरवाजा व खिडकींना सजावटी साठी बांधतात. माझे आई बाबा दोघमिळून घरा समोर उंच गुढी उभारतात. आम्ही सर्व मिळून गुढीची पूजा करतो. गुढीला आईने बनवलेल्या स्वयंपाकाचा नैवेद्य दाखवतो आणि हात जोडून गुढीला नमस्कार करतो. त्यानंतर सर्व एकत्र बसून जेवण करतो. ऊन जास्त वाढल्या नंतर बाबा गुढी घरात आणतात व पाटांवर ठेवतात. संध्याकाळी आम्ही कडुलिंबाचे पान आणि गाठी साखर प्रसाद म्हणून खातो जे आरोग्य निरोगी ठेवण्यास मदत करते. अश्या प्रकारे आम्ही सहपरिवार नवीन वर्षाचे स्वागत करतो.

उंच आकाशात घेऊन भरारी,
गुढी उभी राहिली प्रत्येक दारी....
सुशोभीत अंगणी आज,
दौडत आली नववर्षाची स्वारी....

गुढी पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा !

# ॲडलेड मराठी विद्यालय

- एकूण ३२ विद्यार्थी
- ४ इयत्ता
- १२ शिक्षक आणि २० स्वयंसेवक
- हस्तकला, अभिनय, समूहगान आदी विविध कार्यशाळा
- वार्षिक स्नेहसंमेलन
- ESASA ची मान्यता आणि अनुदान
- BMM अभ्यासक्रमाशी संलग्न

**<u>शाळेसाठी बहुमूल्य वेळ देऊन सतत कार्यरत असणारे स्वयंसेवक</u>**

मुख्याधापक - डॉ. प्रीतम गानू

सचिव:- रेश्मा कुलकर्णी

खजिनदार - अभिजित मोहोळकर

डॉ.आभा कालरो

संध्या चव्हाण

हिमानी निलेश

प्रशासकीय अधिकारी - पूर्वा नाईक

मीनल बालाजीवाले

स्वाती कुलकर्णी

शिक्षक प्रतिनिधी - डॉ. कपिल चौसाळकर

पालक प्रतिनिधी - प्रशांत जगदाळे

तेजस्विनी जगदाळे , भाग्यश्री लोहाटे , श्रुती पाटणकर

ॲडलेड मराठी विद्यालय,
चार्ल्स कॅम्पबेल कॉलेज, ३ कॅम्पबेल रोड , पॅराडाईज
दर रविवारी दुपारी २:३० ते ४:३०
प्रवेशासाठी संपर्क

- डॉ. प्रीतम गानू (मुख्याध्यापक - ०४०४ ९६३ ३६१)
- रेश्मा कुलकर्णी (०४३६ ६३९ ९२४)

ईमेल : - adelaidemarathividyalay@gmail.com

शाळेचे कामकाज सुरळीतपणे चालण्यासाठी आम्हाला कायमच विद्यार्थी, पालक आणि स्वयंसेवकांचे सहकार्य लाभले आहे. आम्ही सर्वांचे मनापासून आभारी आहोत आणि ह्यापुढेही असेच सहकार्य मिळत राहील अशी आशा बाळगतो.